# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक

१.१ विषय प्रवेश

१.२ संशोधन समस्येचे शब्दांकन

१.३ संशोधन समस्येचे महत्त्व

१.४ संशोधनाची मर्यादा व व्याप्ती

१.५ संशोधनाची उद्दिष्टे

१.६ गृहित गोष्टी

१.७ प्रकरणीकरण

## १.१ विषय प्रवेश :

आजचे युग हे विज्ञान युग आहे, महासंगणकाचे युग आहे असे म्हटले जाते. परंतु शिक्षणक्रम व व्यवसायाच्या निवडीबाबत हे स्पर्धा परीक्षांचे युग आहे असे निदर्शनास येते. दहावी, बारावी व पदवी पातळीवर ठराविकच अभ्यासक्रम व ठराविकच नोकऱ्या मिळविण्यासाठी प्रयत्न केले जातात. पर्यायाने असे आढळून येते की, काही व्यवसायात तो व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांची गर्दी झाली आहे तर काही व्यवसायात आवश्यक पात्रता असलेले लोक मिळत नाहीत.

दुसरे असे की, केवळ जीवनावश्यक गरजांची पूर्ती करण्यासाठीच आपण काम करतो असे नाही, तर त्याच बरोबर व्यवसायातील समाधान मिळविण्यासाठी देखील काम करतो किंवा केले पाहिजे. या गोष्टी विविध वृत्ती आणि प्रवृत्ती असलेल्या लोकांना विविध व्यवसायातूनच मिळतात. अशा प्रकारचे समाधान किंवा प्रतिष्ठा मिळत नसल्यास अशा व्यक्तींनी आपला व्यवसाय चुकीचा निवडला आहे, असे समजले पाहिजे.

उत्पादनशीलता किंवा तिचा विकास हे कोणत्याही शिक्षणक्रमाचे एक महत्वाचे उद्दिष्ट मानले जाते. आपले जीवनमान किमान स्वीकार्य पातळी-पर्यन्त आणावयाचे असल्यास आपल्याला दारिद्र्य दूर करावे लागेल. त्यासाठी बेकारी दूर करणे क्रमप्राप्त आहे. ही बेकारी नाहीशी करावयाची असेल तर व्यवसाय शिक्षणाला पर्याय नाही.

आज असे दिसून येते की, आपल्या शिक्षणप्रणालीमध्ये ज्ञान, आकलन इ. ज्ञानात्मक उद्दिष्टांवरच भर दिला जातो. तथापि क्रियात्मक किंवा कौशल्यात्मक उद्दिष्टांकडे जवळजवळ दुर्लक्ष केले जाते. परिणामत: आजच्या शाळा व महाविद्यालये हे सुशिक्षित बेरोजगारांचे तांडे निर्माण करण्याचे कारखाने बनले आहेत.

आजच्या शिक्षणातून केवळ पुस्तकी शिक्षण देण्यात येत असे म्हटले जाते. उच्च-माध्यमिक स्तर देखील याला अपवाद नाही. माध्यमिक वा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी हा किमान काही जीवनोपयोगी उत्पादक कार्य करू शकला पाहिजे अशी समाजाची अपेक्षा आहे. अशी अपेक्षा करण्यात काही वावगे आहे असे वाटत नाही आणि म्हणूनच सध्याच्या उच्च माध्यमिक शाळेतून किमान काही व्यवसायांचे शिक्षण दिले जावे अशी अपेक्षा आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सुनियोजित, पद्धतशीर व काटेकोरपणे व्यवसाय शिक्षणाचे कार्यक्रम आखण्यावर भर दिला आहे. महाराष्ट्र राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शिक्षणाच्या व्यावसायीकरणाच्या दिशेने दीर्घकालीन नियोजन करण्याकरिता डॉ. माधुरीबेन शाह यांच्या अध्यक्षतेखाली जुलै, १९८६ मध्ये एक उच्चाधिकार समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालात १०+२+३ या शैक्षणिक स्तरांपैकी अधिक २ स्तरावर शिक्षणाचे व्यवसायीकरण होण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये इ.स. १९९० पर्यन्त १० टक्के विद्यार्थी उच्च माध्यमिकचे व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण करतील व २५ टक्के विद्यार्थी १९९५ नंतर ते पूर्ण करतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. ही अपेक्षा मूर्त स्वरूपात येण्यासाठी +२ या स्तरावर आपल्याला इतक्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय शिक्षण देण्याची तरतूद केली पाहिजे. या दृष्टीने विचार करताना आज किती विद्यार्थ्यां-साठी साठी व्यवसाय शिक्षणाची तरतूद करू शकलो ते पाहाणे आवश्यक नव्हे तर अनिवार्य ठरते.

उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षणाचे व्यावसायीकरण करण्यासाठी केंद्र शासनाने आर्थिक साहाय्य देण्याची योजना आखली आहे. या योजनेखाली १९८७-८८ मध्ये केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याला रू. ३.९६ कोटी खढे आर्थिक साहाय्य दिले होते. हे आर्थिक साहाय्य १६९ शाळांमध्ये ५०७ अभ्यासक्रम सुरू

करण्यासाठी होते. यात व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाने प्रबलन, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिका-यांच्या कार्यालयाचे प्रबलन, राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची स्थापना निवड केलेल्या संस्थामध्ये शिक्षक व अन्य कर्मचा-यांची नियुक्त अभ्यासक्रमासाठी आवश्यक अशा साहित्याची खरेदी, कार्यशाळांचे बांधकाम, अभ्यासक्रम तयार करून त्या अनुषंगाने शैक्षणिक साहित्य तयार करणे, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि जिल्हा पातळीवर व्यवसाय शिक्षणासंबंधीचे सर्वेक्षण या बाबींचा अंतर्भाव होता. केंद्र शासनाने देऊ केलेल्या या आर्थिक साहाय्याचा पुरेपूर लाभ उठविला गेला की नाही हे तपासावयाचे असल्यास आपल्याला कोणते व्यवसायविषयक अभ्यासक्रम चालू होते आणि कोणते व्यवसायविषयक नवीन अभ्यासक्रम सुरू केले गेले याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

व्यवसाय शिक्षण हे राष्ट्रविकासाचे प्रमुख साधन आहे. सर्व आर्थिक क्षेत्रामध्ये उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी व्यवसाय शिक्षणाचे योगदान अत्यावश्यक आहे. या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी उच्च माध्यमिक शिक्षणाची अशी सांगड घातली पाहिजे की, उच्च माध्यमिक शिक्षणाच्या काळात व्यवसायाच्या कौशल्याशी व तत्वांशी परिचित झालेले विद्यार्थी बाहेर पडल्यावर ते पारंपारिक पध्दतीने व्यवसाय जगात काम करणा-या व्यक्तीपेक्षा जास्त कौशल्य व उत्पादनक्षमता दाखवू शकतील.

१.२ <u>संशोधन समस्येचे शब्दांकन</u> :

प्रस्तुत समस्येचे शब्दांकन म्हणूनच खालीलप्रमाणे केले आहे :

" उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षणाच्या
व्यवसायीकरणाचा चिकित्सक अभ्यास."

संशोधन हे एक शास्त्रीय अभ्यास कार्य आहे. शास्त्रीय अभ्यासात संज्ञा एका विशिष्ट अर्थाने वापराव्या लागतात. तसेच संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट व्हाव्यात एवढयासाठी प्रस्तुत संशोधनाच्या समस्येच्या विधानात वापरलेल्या महत्वाच्या विविध संज्ञाचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

उच्च माध्यमिक स्तर -

उच्च माध्यमिक स्तर याचा अर्थ शैक्षणिक आकृतीबंधातील १०+२+३ मधील फक्त +२ स्तरापुरता मर्यादित आहे. यामध्ये कला, वाणिज्य, शास्त्र या शाखांमधील इ. ११ वी व इ. १२ वी या इयत्तांचा समावेश आहे.

शिक्षणाचे व्यावसायिकरण -

शिक्षणाचे व्यावसायीकरण या शब्दप्रयोगाने शिक्षणाच्या विविध स्तरावरील अभ्यासक्रमात एखाद्या किंवा अनेक व्यवसायांचे ज्ञान देऊन त्या व्यवसायाला किंवा व्यवसायांना अत्यावश्यक असलेला दृष्टिकोन आणि कौशल्य निर्माण करून आत्मसात करण्यासाठी केलेली योजना.

या व्यवसायांचे ज्ञान व कौशल्यांचे हे शिक्षण अशा अभ्यासक्रमांचे केवळ वरवरचे किंवा उपरे असे अंग न होता ते त्या अभ्यासक्रमांचे एक अविभाज्य असे अंग बनावे अशी अपेक्षा आहे.

प्रस्तुत शोध निबंधाच्या संदर्भात शिक्षणाचे व्यावसायीकरण या शब्दप्रयोगाचा अर्थ उच्च माध्यमिक स्तरावरील म्हणजेच इ. ११ वी व इ. १२ वी यांच्या अभ्यासक्रमात अंतर्भूत केलेले विविध व्यवसायांचे पाठयक्रम (सिलॅबस) एवढयाच मर्यादित अर्थाने घेतला आहे.

चिकित्सक अभ्यास -

चिकित्सक या संज्ञेने समस्येचे सखोल, सूक्ष्म समीक्षणात्मक परीक्षण अपेक्षित आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास या संज्ञेने उच्च माध्यमिक स्तरावर म्हणजेच इ. ११ वी व १२ वी च्या अभ्यासक्रमात कोणत्या विविध व्यवसाय शिक्षणाचा अंतर्भाव केला आहे ? अभ्यासक्रमातील अंतर्भूत व्यवसाय शिक्षणांची उद्दिष्टे किती प्रमाणात सफल झाली आहेत ? ती सफल झाली नसल्यास त्याची कारणे कोणती ? या कारणांचे निराकरण करण्यासाठी कोणती उपाययोजना करावयास पाहिजे ? आणि कोणत्या व्यवसाय शिक्षणाचा अंतर्भाव करता येऊ शकेल ? या दृष्टीने केलेला अभ्यास.

१.३ संशोधन समस्येचे महत्व :

शालेय शिक्षणामध्ये व्यवसाय शिक्षणाचे महत्व वाढविण्याचे प्रयत्न अनेकदा केले गेले परंतु त्यात म्हणावे तसे यश आले नाही. ह्या अपयशाची नेमकी कारणमीमांसा करून त्याची नेमकी कारणे शोधल्यास पुढील अपयश टाळण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

व्यवसाय शिक्षणाचे महत्व वाढवावयाचे असेल तर त्याची सुरूवात शालेय शिक्षणापासूनच करणे उचित ठरेल. शालेय जीवन आणि व्यवसाय यांमधील महत्वाचा दुवा म्हणजे व्यावसायिक शिक्षण घ्यावे लागते.

इयत्ता १० वी ची परीक्षा पास झाल्यावर अनेक विषय आणि अभ्यासक्रम निवडता येतात. उच्च माध्यमिक स्तरावर २ वर्षे मुदतीचे अभ्यासक्रम असतात. विषय निवडताना आपली आवड-निवड तसेच शैक्षणिक प्रगती विचारात घेतली पाहिजे. विषय निश्चित करताना अवास्तव महत्वाकांक्षा बाळगल्यास अपयश पदरी पडण्याची शक्यता जास्त असते.

आज तांत्रिक प्रगतीमुळे व्यवसायाची संख्या झपाट्याने वाढत आहे. अमेरिकेसारख्या तांत्रिकदृष्टया प्रगत असलेल्या देशात तर अक्षरश: हजारो व्यवसायांची नोंद झालेली आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे स्वतंत्र भारतातही व्यवसायाची क्षितीजे रूंदावत आहेत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे एक प्रमुख उद्दिष्ट मानले जाते. सर्वांगीण विकासामध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक आणि क्रियाकौशल्यात्मक बाबींचा विकास अभिप्रेत आहे. आजच्या शिक्षणप्रणालीवर असा एक आक्षेप घेतला जातो की, आज विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासावरच फार मोठा भर दिला जातो. आणि इतर बाबींच्या विकासाकडे दुर्लक्ष केले जाते. शिक्षणाच्या यशस्वी व्यावसायीकरणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होऊ शकेल. शिक्षणाचे यशस्वी व्यवसायीकरणासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरू शकेल. अशाप्रकारे आपल्या शिक्षणप्रणालीवर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपाचे निराकरण करून विद्यार्थ्यांच्या (विशेषत: विद्याशाखांमधील अभ्यासक्रमाची अभिरूची आणि क्षमता नसलेल्या विद्यार्थ्यांच्या) सर्वांगीण विकासासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त करण्याची शक्यता आहे.

प्रस्तुत संशोधन विद्यार्थ्यांना व्यवसाय निवड, तयारी आणि त्यातून त्यांचे भवितव्य घडण्यासाठी महत्वाचे आहे. वर्तमान जीवन गतिमान व गुंतागुंतीचे बनलेले आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी तसेच व्यावसायिक दृष्टिकोन वाढीस लागण्यासाठी उपयुक्त आहे.

जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी निवडावयाचा जीवनक्रम हा क्षमता, आवड, दृष्टिकोन, मनोवृत्ती, इत्यादी गोष्टींवर अवलंबून असतो. अतिमहत्वाकांक्षी किंवा अतिनिम्नस्तरावरील आकांक्षित जीवनक्रम सामाजिक, समायोजनाला बाध आणू शकतो. उच्च माध्यमिक स्तरावर व्यवसाय शिक्षण घेणाऱ्या व

विद्यार्थ्यांला त्याचा व्यावसायिक विकास साधण्यासाठी आणि त्याच बरोबर सामाजिक समायोजन साधण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरू शकेल.

प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांचे घर, शाळा, समाज आणि विशेषतः व्यवसायक्षेत्रात सुकरतेने समायोजन घडण्यास मदत होण्याची शक्यता आहे.

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी यामुळे मानव साधन-संपत्तीचा योग्य प्रकारे विकास करून त्या विकसित मानव शक्तीचा राष्ट्रीय विकासासाठी उपयोग करून घेण्यास मदत होईल.

व्यवसायाच्या विविध स्तरावर आवश्यक असलेले मनुष्यबळ निर्माण होण्याच्या दृष्टीने सुध्दा प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारसी उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे.

आपल्या शिक्षणप्रणालीतील स्थगन व गळती यासारख्या समस्या तसेच सामाजिक जीवनातील बेकारी, अर्ध-बेकारी व प्रछन्न बेकारी यासारख्या समस्या सोडविण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरू शकेल.

शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर महाविद्यालयाकडे वळणारा विद्यार्थ्यांचा लोंढा थोपवून विद्यार्थ्यांमधील मर्यादित क्षमतांचा योग्य प्रकारे विनियोग करून घेऊन भावी काळामध्ये त्यांच्यामध्ये येऊ शकणाऱ्या नैराश्याला पायबंद घालण्यासाठी सुध्दा या संशोधनाचा उपयोग होण्यासारखा आहे.

प्रस्तुत संशोधनामुळे उच्च माध्यमिक स्तरावरील व्यावसायिक शिक्षण यशस्वी होण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन मिळण्याची शक्यता आहे. त्या योगे उच्च माध्यमिक शिक्षण अधिक अर्थपूर्ण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१.४ संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

या संशोधनाच्या मर्यादा व व्याप्ती खालील प्रमाणे सांगता येतील :

हे संशोधन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे यांच्या इ. ११ वी व इ. १२ वी च्या स्तरावर राबविल्या जाणा-या निरनिराळ्या सहा विषय शाखा समूहाखाली खालील २४ व्यवसाय शिक्षणाच्या पाठ्यक्रमापुरते मर्यादित आहे.

अ) तांत्रिक शिक्षण समूह -


१. विजेवर चालणा-या यंत्राची निगा राखणे.
२. इतर यंत्रांची निगा राखणे.
३. स्कूटर आणि मोटार सायकल दुरूस्ती.
४. सामान्य स्थापत्य अभियांत्रिकी.
५. इलेक्ट्रॉनिक्स.
६. केमिकल प्लॅन्ट ऑपरेशन
७. संगणक शास्त्र.

ब) वाणिज्य विषय समूह -

१. पतपेढीशास्त्र
२. विमाशास्त्र
३. कार्यालयीन व्यवस्थापन
४. व्यापार आणि विक्रय कला
५. लघुउद्योग व स्वयंरोजगार
६. प्राथमिक औद्योगिक व्यवस्थापन

क) शेती विषय समूह -

१. प्राणीशास्त्र आणि दुग्ध व्यवसाय
२. शेती विषयक कारागिरी
३. पीकशास्त्र
४. फुलझाडे व बागकामशास्त्र


राधानगरी
आजरा
चंदगड
कडगाव
उ

ड) अन्न तंत्रशास्त्र -

१. पाकशास्त्र
२. बेकरी व मिठाई बनविणे
३. अन्न संरक्षण शास्त्र

इ) मत्स्योद्योग विषय समूह -

१. गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन
२. मत्स्य संरक्षण शास्त्र

फ) अनुषंगिक वैद्यकीय विषय समूह -

१. प्राथमिक प्रयोगशाळा तंत्र
२. बहुउद्देशीय आरोग्य सेवक व्यवसाय.

प्रस्तुत शोधप्रबंधात वरील व्यावसायिक विषयांपैकी कोणते व्यवसाय सुरू करण्यात आले आहेत, कोणते आले नाहीत यांचा शोध घेऊन सुरू केलेल्या विषयाच्या यशस्वितेचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हे संशोधन कोल्हापूर जिल्हातील ज्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातून हा व्यावसायिक अभ्यासक्रम राबविला जातो त्यापुरता मर्यादित आहे. सबब या संशोधनात कोल्हापूर जिल्हातील खालील १० शिक्षण संस्थांचा विचार केला आहे.

१) महाराष्ट्र हायस्कूल, कोल्हापूर
२) आर.के. कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर
३) दि न्यू कॉलेज, कोल्हापूर
४) एस.एम. लोहिया ज्यु. कॉलेज, कोल्हापूर
५) तात्यासाहेब तेंडूलकर कला व वाणिज्य महाविद्यालय (मुलींचे), कोल्हापूर.

६) गोविंदराव हायस्कूल, इचलकरंजी

७) वारणा महाविद्यालय, वारणानगर

८) हुपरी इंग्लीश स्कूल, हुपरी

९) बळवंतराव झोले विद्यालय, जयसिंगपूर

१०) शाहू विद्यालय, कागल, जि. कोल्हापूर.

१.५ संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनाची पुढील उद्दिष्टे आहेत :

१. उच्च माध्यमिक स्तरावर कोणत्या व्यवसायांचे शिक्षण दिले जाते त्याचे सर्वेक्षण करणे.

२. हे व्यावसायिक शिक्षण किती मर्यादेपर्यन्त यशस्वी झाले आहे ते अजमावणे.

३. हे व्यावसायिक शिक्षण यशस्वी झाले नसल्यास त्याच्या कारणांचा शोध घेणे.

४. या कारणांचे निराकरण होण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

१.६ गृहित गोष्टी :

१) शिक्षणाच्या व्यावसायीकरणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वसाधारण शिक्षणक्रमातून व्यावसायिक क्षेत्राकडे प्रवेश सहजतेने होऊ शकतो.

२) शिक्षणाचे व्यावसायीकरण केल्यास महाविद्यालयाकडे जाणारा विद्यार्थ्यांचा लोंढा योग्यप्रकारे व्यावसायिक शिक्षणाकडे वळविता येईल.

३) सर्वसाधारण शिक्षणामध्ये आवड, अभिवृत्ती, अभिरूची नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय शिक्षण हा एक चांगला पर्यायी मार्ग उपलब्ध आहे.

## १.७ प्रकरणीकरण :

प्रस्तुत संशोधनासाठी संकलित केलेल्या सामग्रीचे वर्गीकरण व पृथःक्करण करून त्यावर आधारित निष्कर्ष काढले आहेत. निष्कर्ष काढण्यासाठी योग्य त्या सांख्यिकीय परिमाणांचा वापर केला आहे. तसेच त्याप्रमाणे शिफारसी केल्या आहेत. या सर्वांचे पुढीलप्रमाणे सहा प्रकरणांत विभाजन केले आहे.

### प्रकरण एक - प्रास्ताविक

या प्रकरणात ही समस्या कशी निर्माण झाली त्याचा ऊहापोह केला आहे. समस्येचे शब्दांकन करून प्रस्तुत संशोधनाच्या विधानात वापरलेल्या विविध संज्ञांच्या स्पष्टीकरणार्थ त्यांच्या व्याख्या दिल्या आहेत. संशोधन समस्येचे महत्त्व, व्याप्ती, मर्यादा स्पष्ट केली आहे. थोडक्यात या प्रकरणात संशोधनविषयाचा परिचय करून दिलेला आहे.

### प्रकरण दोन - शिक्षणाचे व्यावसायीकरण : अर्थ, महत्व, तात्त्विक भूमिका, उद्दिष्टे व गरज

प्रस्तुत प्रकरणात शिक्षणाचे व्यावसायीकरण म्हणजे काय, त्याचे व्यावसायिक क्षेत्रामध्ये असणारे स्थान व महत्व त्याप्रमाणे सद्यःस्थितीत त्याची गरज, भूमिका व उद्दिष्टे इ. गोष्टींचा ऊहापोह करण्यात आलेला आहे.

### प्रकरण तीन - संशोधन विषयाशी संबंधित संशोधित साहित्याचा मागोवा

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधित प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. संशोधनविषयाशी संबंधित आतापर्यन्त कोणते संशोधन झाले आहे ? कोणत्या प्रकारची सामग्री गोळा करण्यात आली ? त्यासाठी कोणती साधने वापरण्यात आली ? गोळा

केलेल्या सामग्रीचे कशाप्रकारे वर्गीकरण, विश्लेषणात करण्यात आले ? अन्वयार्थ कसा लावण्यात आला आणि कोणते निष्कर्ष काढण्यात आले ? आणि कोणत्या शिफारसी करण्यात आल्या या विषयी ऊहापोह केला आहे.

प्रकरण चार – संशोधनाची कार्यपध्दती

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने कोणती कार्यपध्दती वापरली हे स्पष्ट केले आहे. नमुना निवड, वापरलेली साधने, साधने वापरण्याचे हेतू व समर्थन या संदर्भात माहिती दिलेली आहे.

प्रकरण पाच – संशोधन माहितीचे विश्लेषण, निर्वचन आणि अन्वयार्थ

प्रस्तुत प्रकरणात प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षणाद्वारे गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करून या विश्लेषणावर आधारित अन्वयार्थ लावण्यात आलेला आहे.

प्रकरण सहा – निष्कर्ष आणि शिफारसी

प्रस्तुत प्रकरणात संशोधनसामग्रीच्या केलेल्या विश्लेषणाच्या आणि लावलेल्या अन्वयार्थावर आधारित निष्कर्ष काढलेले आहेत. निष्कर्षांवर आधारित शिफारसींचा निर्देश केला आहे. तसेच प्रस्तुत संशोधन विषयाशी प्रत्यक्षपणे निगडित नसलेल्या तथापि प्रस्तुत समस्येचे अधिक सम्यक आकलन होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश करण्यात आलेला आहे.

## संदर्भ

१) अग्रवाल जे.सी., ` नयी शिक्षा नीती ` (दिल्ली : प्रयागत प्रकाशन, १९८६)

२) पिंपळखरे मो.ह., ` शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन, ` (पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, १९७१)

३) पिंपळखरे मो.ह. व चौधरी नलिनी, ` व्यावसायिक जीवनाची प्रवेशद्वारे ` (पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, १९८७)

४) मेहंदळे-वाघ-डिंगणे, ` व्यावसायिक जगाची तोंडओळख, ` (मुंबई : नवनीत प्रकाशन, १९८९)

५) मुळे रा.शं. व उमाठे वि.तु., ` शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, ` (नागपूर : महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, १९८७)

६) शिक्षण संक्रमण, जानेवारी, १९८९, काळपांडे व.अ., ` राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ महाराष्ट्राची वाटचाल, ` (पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ)

७) शिक्षण संक्रमण, डिसेंबर १९८७, गेडाम के.एम., ` महाराष्ट्रातील व्यवसाय शिक्षण, ` (पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ)

8) Bhatnagar Suresh, 'Kothari Commission Recommendations and Evaluation with text on National Policy on Education', (Meerut : Loyal Book Depot, 1984).

9) Kochhar S.K., 'Educational and Vocational Guidance in Secondary Schools, (New Delhi :Sterlings Publishers (P) Ltd., 1984).

10) State Board of Secondary and Higher Secondary, Syllabii for Standards XI and XII - Vocational Courses, (Pune : Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education, 1988).